सुधारित विकास योजना - नागपूर
महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१कक) (ग) अन्वये अधिसूचना निर्गमित करणेबाबत..
नागपूर मेट्रोसाठी वाणिज्य वापर मेट्रो रेल्वे स्टेशन व अनुषंगीक वापरासाठी...

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
शासन निर्णय क्र. टिपीएस-२४१५/१८२/प्र.क्र.९८/२०१५/नवि-९,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - १४ मार्च, २०१८.

**शासन निर्णय:-** सोबतची अधिसूचना (मराठी / इंग्रजी) महाराष्ट्र शासनाच्या साधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,*

(रा. शा. चौहान)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**
१) विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
२) संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.
४) आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
५) व्यवस्थापकीय संचालक, नागपूर मेट्रो रेल कार्पोरेशन लि. नागपूर.
६) जिल्हाधिकारी, नागपूर.
७) उप सचिव (नगर विकास), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) विभागीय सह संचालक नगररचना, नागपूर विभाग, नागपूर.
९) सहायक संचालक नगररचना, नागपूर शाखा, नागपूर.
(त्यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत अधिसूचनेच्या अनुषंगाने अधिप्रमाणित करण्यात यावयाच्या भाग नकाशाच्या ०५ प्रती शासनास सत्वर सादर कराव्यात.)
१०) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, नागपूर.
(त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यात येऊन त्याच्या प्रत्येकी ०५ प्रती या विभागास, संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे व विभागीय सहसंचालक नगररचना, नागपूर विभाग, नागपूर यांच्याकडे पाठवाव्यात.)
११) कक्ष अधिकारी, कार्यासन नवि-२९, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
(त्यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत अधिसूचना शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.)
१२) निवड नस्ती (कार्यासन, नवि-९)

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**
**दिनांक - १४ मार्च, २०१८**

## अधिसूचना

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६*

क्रमांक:**टिपीएस-२४१५/१८२/प्र.क्र.९८/२०१५/नवि-९:** ज्याअर्थी, नागपूर शहराची सुधारित विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिले आहे) चे कलम ३१ (१) अन्वये शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४९६/२६४३/ प्र.क्र.३००(अ)/९७/नवि-९, दि. ०७ जानेवारी, २००० अन्वये मंजुर झाली असुन ती दि. ०१ मार्च, २००० पासून अंमलात आली आहे (यापुढे "उक्त विकास योजना" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील, नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पास (यापुढे "उक्त मेट्रो" असे संबोधले आहे) राज्य शासनाने निर्णय क्र. नासुप्र-३३१३/प्र.क्र.४१/नवि-७, दि. ३० जानेवारी, २०१४ अन्वये तर केंद्र शासनाने पत्र क्र. के-१४०११/२४/२०१३-एमआरटीएस-४, दि. ११ फेब्रुवारी, २०१४ नुसार तत्वत: मान्यता दिलेली असून पत्र क्र. के-१४०११/(एन-१)/२०१४/एमआरटीएस-३, दि. २१ ऑगस्ट, २०१४ अन्वये अंतिम मान्यता दिली आहे :

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत, सोबत जोडलेल्या नकाशात दर्शविल्यानुसार, उक्त मेट्रोचे संरेखनाखालील जागेपैकी (यापुढे "उक्त जमिनी" असे संबोधले आहे) काही जमिनी वाणिज्य / रहिवास / सार्वजनिक निमसार्वजनिक / औदयोगिक व ना विकास विभागात समाविष्ट आहेत तर काही जमिनी काही आरक्षणांनी बाधित होत आहेत :

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत, सोबत जोडलेल्या नकाशात दर्शविल्यानुसार, उक्त जमिनीत मेट्रो संरेखन (मार्गिका, स्थानके, वाहनतळ, वाणिज्य विभाग यासह) दर्शविणे (यापुढे "प्रस्तावित फेरबदल" असे संबोधले आहे) व्यापक जनहिताच्या दृष्टीने आवश्यक झाले आहे, असे राज्य शासनाचे मत झाले आहे :

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१कक) अन्वये प्रदत्त असलेल्या अधिकारानुसार शासनाने, प्रस्तावित फेरबदलाच्या अनुषंगाने जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी प्रस्तुतची सूचना दि. ६/९/२०१४ रोजीच्या शासन राजपत्रात प्रसिध्द करुन तसेच वृत्तपत्रात प्रस्तावित फेरबदलासंदर्भात प्राप्त होणाऱ्या सूचना / हरकतींवर सुनावणी देण्यासाठी विभागीय सह संचालक नगररचना, नागपूर विभाग, नागपूर यांची, उक्त अधिनियमाचे कलम १६२ (१) अन्वये अधिकारी म्हणून नियुक्ती केली ;

आणि ज्याअर्थी, नियुक्त अधिकारी यांनी दि. २३ एप्रिल, २०१५ रोजी आणि दि. १२ एप्रिल, २०१७ रोजी त्यांचा अहवाल शासनास सादर केलेला आहे. तद्नंतर आवश्यक त्या चौकशीअंती व संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर प्रस्तावित फेरबदलापैकी शासनाने दि. दि. १० नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे मंजूरी दिलेला फेरबदल प्रस्ताव सोडुन प्रस्तावित

फेरबदलापैकी वाहनतळ, स्टेशन्स व वाणिज्य वापराकरीताचे दि. १६ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे प्रतिक्षाधिन ठेवण्यात आलेले फेरबदल प्रस्तावास मान्यता देण्याचे शासनाचे मत झाले आहे ;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे उपकलम (१कक) (ग) अन्वये व त्या अनुषंगाने असलेल्या इतर अधिकारांचा वापर करुन विकास योजनेतील प्रस्तावित फेरबदलास खालील प्रमाणे मान्यता देत आहे ;

**फेरबदल**

"वाहनतळ, स्टेशन्स व वाणिज्य वापराकरीताचे कलम ३७ (१कक) (क) अन्वये दि. १६ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे प्रतिक्षाधिन ठेवण्यात आलेले फेरबदल प्रस्तावाना प्रसिध्द केल्याप्रमाणे आता या द्वारे मान्यता देण्यात येत आहे."

प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा नकाशा, प्रस्तुत अधिसूचनेसह, जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत १ महिना कालावधीसाठी उपलब्ध राहील.

१. सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.
२. आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
३. विभागीय सह संचालक नगररचना, नागपूर विभाग, नागपूर.

प्रस्तुत अधिसूचना शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सुध्दा प्रसिद्ध करण्यात यावी.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,*

(र. शा. चौहान)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

C:\2014-2017\Kalam\Kalam 37(1kk)\Metro C.R.98-सूचना.docx




Sanctioned under Government Notification
Urban Development Deptt. No. TPS-2496/2603/CR-300(a)/97/UD-9 dated 07-01-2000

Dy. Secretary to Govt.
Urban Development Department

| | | |
|---|---|---|
| | 7 | |
| 11 | 12 | 13 |
| | 18 | |

CHAIRMAN
NAGPUR IMPROVEMENT TRUST

SUPERINTENDING ENGINEER
NAGPUR IMPROVEMENT TRUST

Joint Secretary
Urban Development Department
Mantralaya, Mumbai-32

Executive Engineer (PROJECT)
Nagpur Improvement Trust

Assistant Engineer (Project)
Nagpur Improvement Trust